महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि. नाशिक
पत्ता- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मानूर, कोल्हापूर फाटा, ता.कळवण (पिन-423501)
दूरध्वनी क्र. 02592-250101 **Email :- poitdp.kalwan-mh@gov.in**

निविदेची माहिती

१	निविदा वर्ष	सन २०२२-२३ निविदा क्रमांक- ४८/ प्रकल्प कळवण /२०२२-२३
२	निविदा सूचना	केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या युवक-युवतींना विविध प्रशिक्षण देणेबाबत.
३	विभाग	आदिवासी विकास विभाग.
४	कार्यालय प्रमुख	श्री. विशाल नरवाडे, भा.प्र.से. (I.A.S.)
५	पदनाम	सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प कळवण, जि. नाशिक.

क्र.	निविदा कामाचा तपशील (प्रशिक्षण योजनांची यादी)	प्रशिक्षण कालावधी	अर्ज शुल्क रु.	बयाणा रक्कम रु.	निविदा रक्कम रु.
१	अनु. जमातीच्या बचतगटांना मधसंकलन करण्याचे प्रशिक्षण देणे.	१५ दिवस	१५००	७५००	५०००००
२	अनु. जमातीच्या बचतगटांना मऊ खेळणी (Soft Toys) बनविण्याचे प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	२५०००००
३	अनु. जमातीच्या लाभार्थ्यांना सोलर व सोलर उपकरणे दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	२५०००००
४	शासकीय आश्रम शाळेतील इयत्ता ६ वी, ७ वी , ८ वी, ९ वी, १० वी व इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रणालीवर आधारीत कोडींग कौशल्याचे प्रशिक्षण देणे.	३ महिने	३०००	१५०००	९०००००
५	अनु. जमातीच्या लाभार्थ्यांना वाद्य, हस्तकला, बांबू/लाकडापासून विविध वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	२०००००
६	अनु. जमातीच्या बचतगटांना बेकरीचे पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण देणे.	१५ दिवस	१५००	७५००	२०००००
७	शास. आश्रम शाळेतील शिक्षकांना ॲबॅकसचे प्रशिक्षण देणे.	१५ दिवस	१५००	७५००	५०००००
८	अनु. जमातीच्या महिलांना-युवतींना मॉन्टेसरी टीचर (अंगणवाडी सेविका) प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	५०००००
९	अनु. जमातीच्या युवकांना दुचाकी व चार चाकी दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे.	३ महिने	३०००	१५०००	१००००००
१०	अनु.जमातीच्या युवक/ युवतींना गारमेंट, पेपरबॅग, कापडी पिशवी, लेदरबॅग बनविण्याचे प्रशिक्षण देणे.	३ महिने	३०००	१५०००	१००००००
११	अनु. जमातीच्या युवकांना परवाना देऊन हलके वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे.	३ महिने	३०००	१५०००	१००००००
१२	अनु. जमातीच्या युवक/ युवतींना मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे.	३ महिने	३०००	१५०००	१००००००
१३	अनु. जमातीच्या युवकांना फायबर ऑप्टीकल (FTTH) चे प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	५०००००
१४	अनु. जमातीच्या युवकांना टि.व्ही. / फ्रिज दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे.	३० दिवस	१५००	७५००	१५०००००

सूचना :-

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन राहील. निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पध्दतीत निविदा सादर करणे अनिवार्य आहे. व्यापारी लिफाफ्यात (BOQ) दर नोंदविताना भारतीय पूर्ण रुपयामध्ये (पुर्णांकात) दर नोंदवणे अनिवार्य असून अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

२) **उपरोक्त लाभार्थी संख्या ही अंदाजित असून निविदेतील प्राप्त न्यूनतम दराच्या अनुषंगाने प्रशिक्षण योजनेसाठी मंजूर निधीच्या मर्यादेत अंतिम लाभार्थी संख्या ही निश्चित करण्यात येईल**. प्रशिक्षण स्थळानूसार (तालुका क्षेत्र) लाभार्थी विभागून आदेश निर्गमित करण्याचे व लाभार्थी संख्येत कमी/ अधिक बदल करण्याचे संपूर्ण अधिकार प्रकल्प अधिकारी यांनी राखून ठेवले आहे.

३) एका संस्थेला एका वित्तीय वर्षासाठी जास्तीत जास्त दोन प्रशिक्षण योजना मंजूर करण्यात येतील.

४) ई-निविदा अटी-शर्तीमध्ये शासन नियमांच्या अनुषंगाने बदल करणे, अटी-शर्तीमध्ये वाढ/ शिथील करणे, ई-निविदा कोणत्याही अटी-शर्तीविना रद्द करणे याबाबत संपूण अधिकार प्रकल्प अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

ई-निविदेचे वेळापत्रक

अ. क्र.	प्रकल्प स्तरावरील कार्यवाही	निविदाकारांच्या स्तरावरील कार्यवाही	कार्यवाहीची सुरुवात होण्याचा दिनांक व वेळ	कार्यवाही समाप्त होण्याचा दिनांक व वेळ
१	निविदा प्रकाशित करणे	--	२९.१२.२०२२ वेळ १०.००	३०.१२.२०२२ वेळ ९.५९
२	-	**निविदा डाऊनलोड करणे**	**३०.१२.२०२२ वेळ १०.००**	**९.०१.२०२३ वेळ १७.००**
३	-	**निविदा सादर करणे**	**३०.१२.२०२२ वेळ १०.००**	**९.०१.२०२३ वेळ १७.००**
४	**निविदा-पूर्व बैठक**		**दिनांक ३.०१.२०२३ (मंगळवार) वेळ ११.०० ते १.००**	
५	तांत्रिक लिफाफा उघडणे	-	१०.०१.२०२३ वेळ १०.०१	२०.०१.२०२३ वेळ १७.००
६	व्यापारी लिफाफा उघडणे	-	२०.०१.२०२३ वेळ १७.०१	३१.०१.२०२३ वेळ १७.००

महत्वाच्या सूचना :-

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन राहील. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या Portal वर enroll करणे आवश्यक आहे. इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली संदर्भातील https://mahatenders.gov.in वर नोंदणी करणे अनिवार्य आहे. सदरबाबत शंका असल्यास Contact No.०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

२. निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन स्वरुपात (online Payment Gateway mode/ RTGS/ NEFT) भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम (EMD) भरणेस सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र (As per Industry Dept. G.R.१.१२.२०१६ Para no. ३.१.२.१.-Annexure-८) ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (to be uploaded) बंधनकारक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

३. सर्व इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, इंटरनेट स्पीड, खंडीत विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदाकारास विहीत मुदतीत निविदा सादर करणे शक्य न झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. ईमेल, फॅक्स, हस्तेपोच, व्हॉट्सॲप इत्यादी माध्यमांद्वारे सादर केलेल्या ऑफलाईन निविदांचा विचार केला जाणार नाही.

४. सदर निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे, तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपुर्ण हक्क व निर्णय प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण यांनी राखून ठेवले आहेत.

५. संयुक्त भागीदारी (Joint Venture) स्वरुपातील संस्था सदर निविदेस पात्र ठरणार नाहीत.

स्वाक्षरीत
विशाल नरवाडे, भा.प्र.से.
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास
प्रकल्प कळवण, जि. नाशिक

-: निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफ्यात सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे :-

सूचना :-

इच्छुक संस्था/ कंपनीने प्रत्येक मूळ दस्तावेज किंवा मूळ दस्तावेजाच्या स्व-साक्षांकीत केलेल्या प्रती फक्त PDF स्वरुपात सादर करणे अनिवार्य आहे. तसेच एका योजनेपेक्षा जास्त योजनांकरीता अर्ज करावयाचे असल्यास योजनानिहाय आवश्यक ते कागदपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे-

१	निविदा अर्जाची सर्व पृष्ठे निविदाकार प्रशिक्षक संस्था/ कंपनीने माहिती नोंदवून स्वसाक्षांकीत सादर करणे अनिवार्य राहील.
२	संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १९६०, कंपनी ॲक्ट १९५६, मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत मा. धर्मदाय आयुक्त / मा. सहकार आयुक्त यांचेकडील असल्याचे प्रमाणपत्र.
३	या पुर्वी सदर योजनेअंतर्गत यशस्वीपणे प्रशिक्षण योजना राबविली असल्याचा नजीकच्या तारखेचा दाखला.
४	निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन स्वरुपात (online Payment Gateway mode/ RTGS/NEFT) भरणे आवश्यक आहे. अर्ज शुल्क व बयाणा रक्कम (EMD) भरणेस सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र (As per Industry Dept. G.R.१.१२.२०१६ Para no. ३.१.२.१. - Annexure-८) ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (to be uploaded) बंधनकारक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेबसाईट http://mahaetenders.in वर उपलब्ध आहे.
५	निविदेतील प्रशिक्षण योजना राबविण्याकामी संस्था ही महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTP) असे प्रशिक्षण योजनेसाठी नोंदणीकृत असावी व स्किल्ड इंडिया पोर्टलवर नोंदणीकृत असावी.
६	निविदाकार प्रशिक्षक संस्था / कंपनीच्या नावे पॅन कार्ड.
७	संस्थेचे कंपनीचे /आयकर भरणा विवरणपत्र (वित्तीय वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२) व प्रमाणित ताळेबंद अहवाल (Balance sheet). संस्थेची **सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान ५.०० लक्ष रु.** असणे आवश्यक आहे.
८	संस्थेचे किंवा कंपनीचे मागील ३ वर्षांचे (वित्तीय वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२) मान्यता प्राप्त सनदी लेखापाल यांचेव्दारा प्रमाणित केलेले लेखा परीक्षण अहवाल.(सनदी लेखापाल यांचा UDIN क्रमांक असणे आवश्यक आहे)
९	GST नोंदणी प्रमाणपत्र (रजिस्ट्रेशन) व माहे सप्टेंबर २०२२ अखेर GST (लागु असल्यास) तथा व्यवसाय कर भरणा प्रत.
१०	यापूर्वी शासकीय विभागात योजना राबविण्याचा एका वर्षाचा अनुभव असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अथवा अनुभव दाखला (केवळ आदेशाची प्रत सादर करू नये).
११	प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि. प्रकल्प कळवण यांच्या नावे **दि.१ डिसेंबर २०२२ रोजीनंतर काढलेले रक्कम ५.०० लक्ष रु.चे** आर्थिक सुस्थितीबाबतचे राष्ट्रियीकृत/ शेडयुल्ड बँकेचे ऐपत प्रमाणपत्र **(बँक सॉल्वन्सी सर्टिफिकेट)**
१२	संस्था/ कंपनी शासनाच्या कोणत्याही विभागाकडून काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व निविदा अर्जातील माहिती अचूक सादर करण्यात आल्याबाबतचे १०० रु.च्या स्टँपवर ॲफिडव्हीट प्रतिज्ञापत्र/ हमीपत्र (नमुना- अ).
१३	संस्था/ कंपनी विरुध्द शासनाची फसवणूक, बालमजुरी, अपहार वगैरे आर्थिक किंवा अन्य फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नसल्याचे संस्था अध्यक्ष/ सचिव/ कार्यकारी मंडळ/ विश्वस्त/ कंपनी मालक यांचे पोलीस विभागाकडील चारित्र्य प्रमाणपत्र.
१४	संस्था/ कंपनीकडे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता आवश्यक आलेले तांत्रिक कर्मचारी वर्ग यांची नावे व त्यांची शैक्षणिक- व्यावसायिक अर्हतेविषयक प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
१५	संस्था/ कंपनीला एका वर्षात जास्तीत जास्त २ योजनांकरीता अर्ज भरता येईल. ३ ऱ्या योजनेकरीता अर्ज भरल्यास योजनेच्या क्रमानूसार ३ रा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही व अर्जाची शुल्क रक्कम १,०००/- रु. परतावा करण्यात येणार नाही.
१६	प्रशिक्षण योजनेचा शासनाने मान्यता दिलेला अद्ययावत व्यावसायिक अभ्यासक्रम, शासन नियमानूसार विहीत केलेला कालावधी (तास/ दिवस/ महिने) व वेळापत्रक लागू असल्यास सादर करणे आवश्यक राहील.
१७	प्रशिक्षण योजनेसंदर्भात प्रशिक्षणाच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या भौतिक सोयीसुविधांचा सविस्तर तपशील, मान्यताप्राप्त प्रचलित प्रशिक्षण अभ्यासक्रम तपशील (समाविष्ट विषयघटक, कालावधी व वेळापत्रक), प्रशिक्षण साहित्य/ उपकरणे, तज्ज्ञ मार्गदर्शक, आवश्यक यंत्रसामग्री, प्रशिक्षणाची बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह इ. सविस्तर तपशील सादर करणे अनिवार्य राहील.

सूचना :- उपरोक्त प्रमाणे निविदेसोबत सादर करण्यात आलेले सर्व दस्तावेज / माहिती यामध्ये योजना मंजूर होण्याच्या उद्देशाने माहितीमध्ये फेरफार करून दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास, तशी तक्रार या कार्यालयास प्राप्त झाल्यास, तसेच खोटी किंवा बनावट माहिती/ प्रमाणपत्र/ कागदपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेस काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल. तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, सुधारणा कायदा २००८ अन्वये फौजदारी कारवाई केली जाईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

-:: सर्वसाधारण अटी व शर्ती ::-

१. संस्था धर्मदाय आयुक्त, सहकार आयुक्त यांच्याकडे संस्था नोंदणी अधिनियम १८६०, मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० व कंपनी ॲक्ट १९५६ अंतर्गत शासनाकडे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.

२. एक संस्था/ कंपनी एकापेक्षा जास्त २ प्रशिक्षण योजनांसाठी अर्ज करणार असेल, तर सर्व प्रशिक्षण योजना निविदेसोबत दिनांक १/१२/२०२२ रोजीपासून पुढील दिनांकास काढलेली प्रत्येकी ५.०० लक्ष रु. रकमेची राष्ट्रीयकृत बँकची सॉल्वन्सी मुळ (Original) सर्टिफिकेट स्वतंत्रपणे सोबत जोडणे आवश्यक आहे. रंगीत छायांकीत प्रत ग्राहय धरली जाणार नाही.

३. संस्था/ कंपनी किंवा संस्थेचे/कंपनीचे सदस्य, अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, विश्वस्त यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याबाबतचे सक्षम पोलीस अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षण संस्थेकडे पॅनकार्ड, व्यवसाय कर, वस्तू व सेवा कर तथा आयकर इ. भरल्या बाबत व संस्थेची नोंदणी-मान्यतेबाबत आवश्यक ती कागदपत्रे असावीत. **संस्थेने रक्कम ५.०० लक्ष (अक्षरी पाच लक्ष रुपये) रु.ची राष्ट्रीयकृत बँकेची सॉल्वन्सी निविदेसोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

५. **<u>महाराष्ट्र शासनाच्या प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास</u> अभियानांतर्गत कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाने प्राधिकृत केलेल्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल. निविदेतील प्रशिक्षण योजना राबविण्याकामी संस्था ही महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTP) असे प्रशिक्षण योजनेसाठी नोंदणीकृत असावी व स्किल्ड इंडिया पोर्टलवर नोंदणीकृत असावी.**

६. संस्था/कंपनीस प्रशिक्षणाच्या ठिकाणी असलेल्या मुलभूत व भौतिक सर्व सोयी-सुविधांचा तपशिल निविदेसोबत सादर करणे अनिवार्य आहे. (उदा. प्रशिक्षणाचा मान्यताप्राप्त प्रचलित अभ्यासक्रम तपशील- समाविष्ट विषयघटक, कालावधी व वेळापत्रक, प्रशिक्षण हॉल, यंत्रसामुग्री, प्रशिक्षण साहित्य, तज्ज्ञ मार्गदर्शक, अन्य मुलभूत सुविधा इ.) संस्था/ कंपनीकडे विहीत शासनमान्य व्यावसायिक पात्रता धारण करणारे प्रशिक्षित/ तज्ज्ञ प्रशिक्षक, मार्गदर्शक, आवश्यक यंत्रसामुग्री, इमारत व अनुषंगिक भौतिक सुविधा, प्रशिक्षणार्थ्यांसाठी पुरेशी निवास व्यवस्था (प्रशिक्षण निवासी असल्यास शक्यतो मालकीची) असावी. तसेच भोजन व्यवस्था इ. आवश्यक मुलभूत सुविधांबाबत स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक राहील.

७. संस्था / कंपनीकडे शैक्षणिक अर्हतेचा अनुभवी/तज्ज्ञ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे. प्रशिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांचे व्यावसायिक पात्रतेबाबत प्रमाणपत्र, प्रशिक्षकांची नावे, त्यांची शैक्षणिक-तांत्रिक पात्रता, नोकरीचा कालावधी, अनुभव, तसेच त्यांना नेमून दिलेल्या कामकाज वाटपाचा तपशिल निविदेसोबत सादर करावा.

८. संस्था नोंदणीकृत तथा ३ वर्षांपासून कार्यरत असावी व नमूद प्रशिक्षण राबविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. त्यासाठी संस्थेकडे आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ, साहित्य/ उपकरणे व मुलभुत सुविधा असावे.

९. संस्थेचे तीन वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असावे व संस्थेची आर्थिक सुस्थितीबाबत आर्थिक विवरणपत्र सादर करावे. संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असावी, दिवाळखोर नसावी. शासनाच्या अन्य विभागाने संबंधीत संस्थेविरुध्द आर्थिक दिवाळखोर, संस्थेकडे आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ, साहित्य/ उपकरणे व मुलभुत सुविधा नसल्या कारणाने संस्थेने परिणामकारकरित्या प्रशिक्षण पूर्ण न केल्याबाबत तक्रारीवरून प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रतिबंधीत करून मनाई आदेश काढला असल्यास त्याबाबत माहिती प्रस्तावासोबत सादर करावी. योजना मंजुरीकामी अशा स्वरुपाची कारवाई झाल्याबाबत माहिती लपविली असल्याचे, शासनाची दिशाभूल केलयाचे निदर्शनास आल्यास किंवा सदरबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, चौकशीअंती संबंधीत संस्थेविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

१०. ज्या संस्थांच्या तांत्रिक निविदा पात्र होतील अशा संस्थांनी ऑनलाईन सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती या कार्यालयास आवश्यकता असल्यास (दस्तावेज/ दाखले/ प्रमाणपत्र यांचे वैधतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास) पडताळणीकामी विहीत केलेल्या दिनांकास समक्ष सादर करणे अनिवार्य राहील.

११. अर्जदार संस्था ही रोजगार वा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यास सक्षम असावी. यापूर्वी संस्थेतून प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांपैकी जास्तीत जास्त उमेदवारांनी रोजगार वा स्वयंरोजगार सुरु केलेला असावा.

१२. रोजगारविषयक प्रशिक्षणासाठी पूर्वी झालेल्या प्रशिक्षणापैकी किमान ३३ टक्के प्रशिक्षणार्थींना किमान ६ महिने नोकरी लागली असेल तरच त्या प्रशिक्षणासाठी सदर संस्थेला दुसऱ्या वर्षी काम देण्यासाठी सहमती देण्यात येईल.

१३. निविदेतील नमूद प्रशिक्षण योजना राबविण्याकामी शासकीय विभागांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यासारख्या यंत्रणांना शासन स्तरावरून निर्देशीत केल्यास उक्त प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी संबंधीत शासकीय यंत्रणांकडून करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

१४. **संस्थेने वर नमूद अट क्र. १ ते १२ नूसार तांत्रिक निविदेत प्रशिक्षणासाठी उपलब्ध सर्व सुविधांचा व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास पात्र असल्याबाबतचा सविस्तर तपशील सादर केल्यानूसार नमूद बाबींची प्रकल्प कार्यालयाकडून प्रकल्प अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी/ कर्मचारी यांचेद्वारा प्रत्यक्ष स्थानभेट देऊन पाहणी व पडताळणी करण्यात येईल. त्यानूसार संस्था निवडीकामी पात्रतेच्या निकषांच्या अनुषंगाने उक्त तांत्रिक बाबींचे मुल्यांकन करून संस्था प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यास सक्षम असल्याची पडताळणी करून प्रकल्प स्तरीय समितीच्या निर्णयान्वये संस्था तांत्रिक निविदेत पात्र अथवा अपात्र ठरविण्यात येईल. त्यांनतरच पात्र संस्थांचे निविदा दरांचे लिफाफे उघडण्यात येतील.**

१५. **प्रशिक्षणाचे दर केवळ व्यापारी लिफाफयातील विहीत नमुन्यात (BOQ मध्येच) सादर करणे बंधनकारक असून प्रस्तावातील विहीत नमुन्यातील तांत्रिक लिफाफयात किंवा अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास असे प्रस्ताव अपात्र ठरतील.** अर्जदार संस्था/ कंपनीने नमुद केलेला दर हा प्रशिक्षणासाठी आवश्यक शासनाने विहीत केलेले शुल्क, वाहतूक, प्रवास, साहित्य खर्च व अनुषंगिक खर्चाचा आढावा घेऊन वाजवी दर सर्व देय अनिवार्य करांसहीत **भारतीय चलनातील पूर्ण रुपयांमध्ये (पुर्णांकात** जसे- १०.०० हा दर लागू असून, यात १०.५० हे अपुर्णांकातील दर लागू राहणार नाहीत) नमूद करणे बंधनकारक राहील.

१६. अपूर्ण, कागदपत्रांची पूर्तता नसलेला, अस्पष्ट, चुकीची किंवा संदिग्ध माहिती नोंदविलेला व अन्य कोणत्याही स्वरुपातील सदोष तांत्रिक निविदा अपात्र ठरविण्यात येतील. निविदा सादर करताना येणा-या अडचणी, जसे- Internet Connectivity, Server speed, खंडित विद्युत पुरवठा इत्यादीमुळे निविदा सादर करताना अडचणी आल्यास या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. निविदा विहीत कालावधीत दोन लिफाफा पध्दतीने ऑनलाईन सादर करणे बंधनकारक असल्याने, एखाद्या अर्जदार संस्थेस ऑनलाईन निविदा सादर करणे शक्य न झाल्यास नंतर कुठल्याही स्वरुपाची तक्रार ग्राहय धरली जाणार नाही अथवा संधी देण्यात येणार नाही.तसेच कुठल्याही परिस्थितीत तांत्रिक निविदेतील कागदपत्र ऑफलाईनरित्या टपाल, ईमेल किंवा हस्तेपोहोच स्विकारले जाणार नाहीत.

१७. निविदा कार्यवाहीदरम्यान आयोजित निविदा-पूर्व बैठक, दर मंजुरीबाबत निविदा कार्यवाही सभेस उपस्थित राहण्याकामी, तसेच कार्यारंभ आदेश/ प्रशिक्षण योजनेसंदर्भातील आवश्यक पत्रव्यवहार स्वीकृती यासाठी निविदाकार संस्थेने प्राधिकृत प्रतिनिधीची नेमणूक केल्यास केवळ एकाच व्यक्तीची नेमणूक करून संस्थेच्या अधिकृत पत्राची मूळप्रत तांत्रिक निविदेसोबत सादर करावी व निविदा मंजुरीअंती कार्यालयास सादर करावी.

१८. निविदा मंजुरीकामी गैरवाजवी म्हणजेच निविदा दर अत्यंत कमी किंवा अवाजवी जास्त दर नोंदविल्याचे आढळून आल्यास अशा निविदा दरांबाबत प्रकल्प स्तरीय निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निविदेतील कमी दरामुळे प्रशिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता यावर परिणाम होऊन उक्त अति न्यूनतम दरामध्ये प्रचलित व्यावसायिक प्रशिक्षण दर्जेदारपणे देणे शक्यच नसल्याचा अभिप्राय प्रकल्पस्तरीय समितीद्वारा नोंदवून सदर निविदा अपात्र ठरविण्यात येईल. तसेच जास्त दर नोंदविलेल्या संस्थांसोबत आवश्यकतेनूसार वाटाघाटी करून शासनाचे आर्थिक हित विचारात घेऊनच योग्य व रास्त दराने प्रशिक्षण राबविण्याकामी वाजवी दरास मंजूरीकामी शिफारस करण्यात येतील.

१९. प्रशिक्षणाचे दर नोंदविताना वाजवी प्रचलित दर नोंदविण्यात यावेत. योजना मंजुरीकामी अवाजवी अधिक किंवा कमी, अवास्तव दर नमुद केल्यास अशा देकाराबाबत अंतिम निर्णय घेण्याचा सर्वाधिकार प्रकल्पस्तरीय निर्देश समितीने राखुन ठेवला आहे.

२०. निविदाकाराने सादर केलेल्या दरपत्रकामध्ये प्रचलित शासन नियमानूसार विहीत केलेल्या दरांच्या अनुषंगाने वाजवी दर नोंदविलेले असल्याची खात्री करूनच BOQ मध्ये दर नोंदविणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रवेश शुल्क, प्रशिक्षण साहित्य खर्च, पर्यवेक्षणाची साधने/ उपकरणे (सी.सी.टी.व्ही. कॅमेरा, बायोमेट्रिक मशीन, प्रशिक्षणार्थी उपस्थिती नोंदवही वगैरे), अध्यापन खर्च (प्रशिक्षकांचे मानधन), भोजन- निवास (लागू असल्यास), अन्य अनुषंगिक खर्च, आयकरासह वस्तू व सेवा कर तथा इतर अनिवार्य कर असा एकूण खर्च याबाबत समग्र आढावा घेऊन काळजीपूर्वक अभ्यास करून पूर्ण जाणीवेने दर प्रचलित शासन निर्देशांनूसार वाजवी, रास्त असल्याबाबत खात्री करून नोंदविल्याचे गृहित धरण्यात येईल. त्यामुळे एकदा मंजूर केलेल्या दरांत कुठल्याही परिस्थितीत वाढ करण्यात येणार नाही.

२१. निविदाकाराचे न्यूनतम दर स्वीकृत केल्यानूसार, विहीत अटी-शर्तींचे अनुपालनास्तव निविदाकारास स्वखर्चाने १०० रु.च्या न्यायालयीन मुद्रांकावर करारनामा (ॲफिडव्हीट बॉंड) करून देणे बंधनकारक राहील.

२२. एका संस्थेला एका वर्षासाठी जास्तीत जास्त दोन प्रशिक्षण योजना मंजूर करण्यात येतील.

२३. प्रशिक्षण योजना राबविण्याचे प्रशिक्षण स्थळ हे नाशिक जिल्हा कार्यक्षेत्रांतर्गत निश्चित करण्यात येईल. त्यासंदर्भात मंजूर निविदाकार प्रशिक्षण संस्थेशी समन्वय साधून योग्य प्रशिक्षण स्थळांची निवड करण्यात येईल. तथापि,

प्रशिक्षणार्थी उमेदवारांच्या सोयीनूसार प्रशिक्षण स्थळाची निवड करण्यात येईल व संस्थेस आवश्यकतेनूसार भाडयाने इमारत घेऊन सर्व आवश्यक सुविधा व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून स्थानिक पातळीवर प्रशिक्षण योजना राबविणे बंधनकारक राहील.

२४. उमेदवारांची सुरक्षा व आरोग्याची काळजी घेणे, त्यादृष्टीने प्रशिक्षणार्थी उमेदवारांचा विमा, वैयक्तीक सुरक्षा साधनांचा वापर व आरोग्य तपासणी इ. उपाययोजना करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२५. वय १८ वर्षाखालील बालकांना प्रशिक्षक संस्थांनी प्रशिक्षण योजना कार्यक्रमावेळी नियुक्ती देणे कायदयाने गुन्हा असल्याने तसे आढळून आल्यास संबंधीत संस्थेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२६. संस्थेस या कार्यालयाचे अंतर्गत ७ तालुक्यातील आदिवासी प्रशिक्षणाथी लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत संस्थेस प्रशिक्षण यंत्रसामग्री, साहित्य हलविता येणार नाही.

२७. प्रशिक्षण खर्चाचा निधी मंजूर संस्थेस **प्रथम टप्प्यात २० टक्के निधी वितरण** करण्यात येईल. त्यानंतर प्रशिक्षण योजना कार्यवाहीदरम्यान आदिवासी विकास निरीक्षक यांची प्रशिक्षणस्थळी स्थानभेट देऊन अहवालानूसार **योजनेच्या प्रगतीनूसार ३० टक्के निधी** वितरणाबाबत प्रकल्प अधिकारी यांचेद्वारा निर्णय घेण्यात येईल. **प्रशिक्षण योजना पूर्ण झाल्याअंती ३० टक्के निधी वितरण,** तसेच संस्थेने सादर केलेल्या योजनापूर्ती अहवालासोबत तांत्रिक विभागाचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र (लागू असल्यास), योजनेतील प्रशिक्षणार्थी लाभार्थ्यांचे अभिप्रायार्थ मनोगत, प्रशिक्षण कार्यपूर्तीची छायाचित्रे, फलनिष्पत्ती अहवाल, परवाने निर्गमन, नियुक्ती पत्र (जॉब ऑफर लेटर) इ. बाबींची पूर्तता झाल्याअंती प्रकल्प अधिकारी यांचेद्वारा **अंतिम टप्प्यातील २० टक्के निधी वितरणाबाबत** निर्णय घेण्यात येईल.

२८. **प्रशिक्षण योजना राबविण्यास मंजूर निविदाकार संस्थेने विलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, संस्थेस प्रति आठवडा अर्धा टक्का दंड आकारण्यात येईल व दंडाची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे राहील-**
अ) प्रशिक्षण योजना खर्च २ लक्षापेक्षा कमी असेल, तर एकूण खर्च रकमेच्या कमाल १० टक्के दंड,
ब) प्रशिक्षण योजना खर्च २ लक्षापेक्षा जास्त असेल, तर एकूण खर्च रकमेच्या कमाल ५ टक्के दंड.

२९. निविदेच्या उक्त अटी-शर्तीत बदल करण्याचा, वाढ करण्याचा किंवा शिथील, तसेच रद्द करण्याचा सर्वस्वी अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण तथा अध्यक्ष, प्रथम निर्देश समिती यांनी राखून ठेवला आहे.

३०. उक्त निविदा प्रक्रियाअंती मंजूर निविदाकार संस्था यांनी विहीत अटी-शर्तींच्या अनुपालनास्तव प्रकल्प कार्यालयाशी केलेल्या करारनाम्याबाबत किंवा विशिष्ट अटी-शर्तींबाबत कोणत्याही स्वरुपाचा वाद उद्भवल्यास त्याबाबत नियमोचित बाबींची पडताळणी करून मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग यांचे स्तरावरून अंतिम निर्णय देण्यात येईल व सदरचा अंतिम निर्णय हा निविदाकार व प्रकल्प कार्यालय कळवण यांना बंधनकारक राहील.

(स्वाक्षरित/-)
विशाल नरवाडे, भा.प्र.से.
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
कळवण, जि. नाशिक

उपरोक्त सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य असून बंधनकारक राहतील. उक्त अटी व शर्ती समजून विनाशर्त मान्य करून स्वाक्षरी केली आहे.

ठिकाण -

दिनांक - **निविदा सादरकर्ता अर्जदाराची स्वाक्षरी**

नाव व शिक्का

निविदाकाराचा तपशील

प्रशिक्षण योजनेचे नाव- .....

.....

**** सूचना- रकाना क्र.४ ते १६ मधील माहिती नोंदवताना दस्तावेज निविदेसोबत सादर केले असल्यास 'नाही' खोडावे अन्यथा दस्तावेज सादर केले नसल्यास 'आहे' खोडावे.**

अ.क्र.	तपशिल		माहिती
१	निविदाधारकाचे नाव		
२	संपुर्ण पत्ता		
३	दूरध्वनी क्रमांक	कार्यालय :	
		कंपनी :	
		मोबाईल :	
	ई-मेल आयडी		
४	संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १९६०, कंपनी ॲक्ट १९५६, मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत मा. धर्मदाय आयुक्त / मा. सहकार आयुक्त यांचेकडील असल्याचे प्रमाणपत्र.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
५	बयाणा रक्कम ऑनलाईन भरणा केल्याची ऑनलाईन प्रत.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
६	पॅन कार्ड क्रमांक.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
७	GST नोंदणी प्रमाणपत्र (रजिस्ट्रेशन) (लागु असल्यास)		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
८	माहे सप्टेंबर २०२२ अखेर व्यवसाय कर भरणा व निपटारा प्रमाणपत्र (Clearance).		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
९	दि.१ डिसेंबर २०२२ रोजीनंतर काढलेले रक्कम ५.०० लक्ष रु.चे आर्थिक सुस्थितीबाबतचे राष्ट्रियीकृत/ शेडयुल्ड बँकेचे ऐपत प्रमाणपत्र (बँक सॉल्वन्सी सर्टिफिकेट)		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१०	वित्तीय वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ २०२१-२२, (Financial Year) अखेरचे आयकर विवरणपत्र.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
११	आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र (FY २०१९-२०, २०२०-२१ २०२१-२२).		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१२	मागील ३ वर्षांचे (वित्तीय वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२) मान्यता प्राप्त सनदी लेखापाल यांचेव्दारा प्रमाणित केलेले लेखा परीक्षण अहवाल.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१३	जिल्हा पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्तालयामार्फत संस्थेचे अध्यक्ष व सदस्य यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१४	महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTP) असे प्रशिक्षण योजनेसाठी नोंदणीकृत असल्याचे व स्किल्ड इंडिया पोर्टलवर नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१५	तांत्रिक कर्मचारी वर्ग यांची नावे, त्यांची शैक्षणिक- व्यावसायिक अर्हतेविषयक प्रमाणपत्र व अन्य प्रशिक्षण सुविधांचा तपशील.		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.
१६	निविदाकारास निविदेतील अटी व शर्ती मंजुर असल्याचे, काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व इतर बाबीसदर्भात संलग्न (नमुना क्र.१) नुसार सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र (रु. १०० च्या मुद्रांकावर)		निविदेसोबत सादर केले आहे / नाही.

ठिकाण -

दिनांक - **निविदाकाराची स्वाक्षरी / नाव शिक्का**

निविदाकार संस्था/ बचत गट असल्यास खालील माहिती परिपूर्ण नोंदवावी

संस्था / बचत गटाचे नाव :-

सदर प्रशिक्षण योजना निविदेसाठी आम्ही सर्व सदस्य यांनी निविदेच्या संपूर्ण अटी-शर्ती वाचून समजून घेऊन निविदेत सहभागी होण्यासाठी संमती दर्शवली असून भविष्यात प्रशिक्षण योजना प्रभावीपणे राबविली न गेल्यास त्यास आम्ही जबाबदार असल्याची आम्हास जाणीव असून आम्ही कारवाईस पात्र राहू व त्यासंदर्भात आमची कुठलीही तक्रार राहणार नाही, असे विनाशर्त हमीपत्र आम्ही खालीलप्रमाणे स्वाक्षरी नोंदवून सादर करीत आहोत.

अ. क्र.	संस्था/ बचत गटातील सदस्यांचे नाव	गाव व तालुका	व्यवसाय/ नोकरी	स्वाक्षरी/ अंगठा
१.				
२.				
३.				
४.				
५.				
६.				
७.				
८.				
९.				
१०.				
११.				
१२				

पूर्वअर्हता मूल्यांकन परीक्षण नमुना

ई-निविदा भरावयाची योजना-

ई-निविदा क्रमांक-
निविदाकाराचे नाव व पत्ता-

अ.क्र.	ज्या शासकीय / निमशासकीय संस्थेत प्रशिक्षणाचे काम केले त्या कार्यालयाचे नाव व पत्ता	कार्यारंभ आदेश व अनुभव प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? (होय / नाही)	शेरा

(सोबत कार्यारंभ आदेश व अनुभव प्रमाणपत्र स्वसाक्षांकीत प्रतीत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.)

दिनांक
ठिकाण

निविदाकाराचे नाव व स्वाक्षरी (शिक्क्यासह)

प्राधिकृत प्रतिनिधी नेमणूकीचे पत्र

दिनांक : / /२०२

प्रति,

मा. प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
कळवण, जि. नाशिक.

प्रशिक्षण योजना निविदा क्रमांक :- .....

प्रशिक्षण योजनेचे नाव :- .....

.....

आपल्या कार्यालयाचे स्तरावर सन २०२२-२३ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) योजनेंतर्गत विविध प्रशिक्षण योजनांसाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्दीनूसार निविदा सादर करावयाच्या अर्जातील समाविष्ट विहीत सर्व अटी व शर्ती आम्ही वाचल्या असुन त्या आम्हाला मान्य आहेत.

निविदा कार्यवाहीदरम्यान आयोजित निविदा-पूर्व बैठक, दर मंजुरीबाबत निविदा कार्यवाही सभेस उपस्थित राहण्याकामी, निविदा दरात वाटाघाटी करणे व वाटाघाटीअंती दरमंजुरीकामी संस्थेच्या वतीने अधिकृतपणे शिफारस पत्र देणे, तसेच कार्यारंभ आदेश स्वीकृती, प्रकल्प कार्यालयास प्रशिक्षण योजनेसंदर्भातील आवश्यक पत्रव्यवहार करणे यासाठी श्री./श्रीम. .....

यांची निविदाकार संस्थेकडून प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. त्यानूसार संस्थेच्या अधिकृत पत्राची मूळप्रत तांत्रिक निविदेसोबत सादर करण्यात येत आहे.

संस्था/ कंपनी प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी (शिक्क्यासह)

प्राधिकृत प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी :-

श्री./श्रीम.....

मोबाईल क्रमांक-

प्रतिज्ञापत्र (हमीपत्र)

(नमुना- अ)

दिनांक : / /२०२

प्रति,

मा. प्रकल्प अधिकारी,

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

कळवण, जि. नाशिक.

प्रशिक्षण योजना निविदा क्रमांक :- .....

मी, प्रतिज्ञेवर सादर करतो की, आपल्या कार्यालयाचे स्तरावर सन २०२२-२३ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) योजनेंतर्गत विविध प्रशिक्षण योजनांसाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्दीनूसार निविदा सादर करावयाच्या अर्जातील समाविष्ट विहीत सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

निविदेसोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणताही फेरफार केलेला नाही. निविदेतील व्यापारी लिफाफ्यातील दरपत्रकात नमुद केलेले दर हे विनाअट व विनाशर्त नोंदविलेले आहेत.

तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय, निमशासकीय, शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रस्तुत / प्रस्तावीत नाही. बालमजुरी, कामगार कायदे तरतुदींचे उल्लंघन, लैगिंक पिळवणुक, मानवाधिकारांचे उल्लंघन, शासनाची फसवणूक इ. विषयी आमची संस्था/ कंपनी यांचेविरुध्द कायदेशीर/ न्यायालयीन कारवाई प्रस्तावित नाही अथवा प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही. तसेच कामगार कायदे, मानवाधिकार, किमान वेतन कायदा इ. प्रचलित कायदेविषयक लागू धोरणाचेही आमच्याकडुन काटेकोरपणे पालन होते. नमुद सर्व माहिती मान्य असुन यात चुकीची माहिती अथवा योजना मंजुरीच्या उद्देशाने जाणीवपूर्वक दिशाभूल करणारी माहिती नमूद केल्याचे आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र असेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

निविदा अर्जातील नमूद सर्व अटी-शर्ती हया मी/ आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून उपरोक्त नमूद दरात कुठल्याही स्वरुपात दरवाढ केली जाणार नसल्याचे, तसेच शासन नियमानूसार प्रचलित लागू दर मंजुरीबाबत प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरून शासन तरतुदीच्या अनुपालनास्तव निर्णय घेण्यात येईल, तो निर्णय मला/ आम्हाला विनाशर्त मान्य असून त्याविरोधात आम्हाला न्यायालयात दाद मागता येणार नाही याची पूर्ण जाणीव असून त्यानूसार आम्ही विनाशर्त उपरोक्त दर स्वसंमतीने नमूद केलेले आहेत.

शासनाने अंतिमत: मंजूर केलेले दर मला विनाशर्त मान्य राहतील याबाबत माझी काहीही हरकत राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी / नाव- शिक्का

टिप :- वरील प्रतिज्ञापत्र १०० रु.च्या न्यायालयीन मुद्रांकावर ॲफिडव्हीट सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण, जि. नाशिक
पत्ता- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मानूर, कोल्हापूर फाटा, ता.कळवण (पिन-423501)
दूरध्वनी क्र. 02592-250101 **Email :- poitdp.kalwan-mh@gov.in**

-:: व्यापारी लिफाफा ::-

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेतर्गंत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण कार्यक्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण योजना अंमलबजावणीकामी सादर दरपत्रक

अ.क्र.	योजनेचे नाव	प्रतिव्यक्ती प्रशिक्षण दर रुपये (भारतीय पूर्ण रुपयांत- पुर्णांकात)
१	**केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजनेतर्गंत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण योजनेचे नाव ...**	**सदरचे प्रशिक्षण दर हे BOQ मध्येच नोंदविणे अनिवार्य आहेत.**

{**टिप :-** अर्जातील विहीत विनिर्देशानूसार संस्था/ कंपनी यांनी व्यापारी लिफाफा मध्ये प्रचलित सर्व करांसहीत एकूण खर्च गृहीत धरून **प्रति प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाचे दर असे अंतिम दर (भारतीय पूर्ण रुपयात)** नमूद करण्यात यावेत.}

निविदा अर्जातील नमूद सर्व अटी-शर्ती हया मी/ आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून उपरोक्त नमूद दरात कुठल्याही स्वरुपात दरवाढ केली जाणार नसल्याचे, तसेच शासन नियमानूसार प्रचलित लागू दर मंजुरीबाबत प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरून शासन तरतुदीच्या अनुपालनास्तव निर्णय घेण्यात येईल, तो निर्णय मला/ आम्हाला विनाशर्त मान्य असून त्याविरोधात आम्हाला न्यायालयात दाद मागता येणार नाही याची पूर्ण जाणीव असून त्यानूसार आम्ही विनाशर्त उपरोक्त दर स्वसंमतीने नमूद केलेले आहेत.

शासनाने अंतिमत: मंजूर केलेले दर मला विनाशर्त मान्य राहतील, याबाबत माझी काहीही हरकत राहणार नाही.

दिनांक- / /२०२ **संस्था अध्यक्षांची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का :-**